म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १८८७८




REFBK-0009425

कृष्णगोविंद पुस्तक माला : २

किंमत ५० नये पैसे

# मातीचें सोनें

व

# स्फुट कविता

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ५००५८ दि: ७/८४
वर्ग. १८८४ नोंद. क्र. ५१२१६९

कृष्णगोविंद

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४२५
शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0009425

गणेश चतुर्थी ] किंमत ५० नये पैसे [ ऑगस्ट १९५७

कृष्णगोविंद पुस्तक माला ... ... २

# प्रस्तावना

हें खंडकाव्य आणि स्फुट कविता 'उद्यम' मासिकांत १९२६-२७ सालाच्या सुमारास प्रसिद्ध झाल्या. काव्य व कविता उद्यमप्रवर्तक असल्याने त्या एकत्र छापल्यास मुलांना उपयुक्त होतील असें फार वर्षे मनांत येत होतें. परंतु कांही ना कांही कारणाने तें शक्य झालें नाहीं. काव्याची प्रत माझ्याजवळ नव्हती. 'उद्यम' मासिकाचे संपादक श्री. वाडेगांवकर यांस मी माझी कल्पना कळविली व 'उद्यम' च्या जुन्या अंकांतून तें काव्य मिळूं शकेल काय म्हणून मी त्यांस विचारलें व स्वतंत्र रीतीने प्रसिद्ध करण्याची परवानगीहि मागितली. त्यांनी कळविलें कीं कांही भाग प्रसिद्ध झालेले अंक त्यांचेकडे नाहीत. नॅशनल लायब्ररी, कलकत्ता यांचेकडून मला तो भाग मिळूं शकला आणि श्री. वाडेगांवकर यांनी पुस्तक स्वतंत्रपणे छापण्यास परवानगी दिली म्हणून हें पुस्तक मला वाचकांचे हातीं देणें शक्य झालें. श्री. वाडेगांवकर यांनी दिलेल्या परवानगीबद्दल आणि अल्प मुदतींत पुस्तक छापून दिल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

साधारण प्रौढ मुलांना उद्यमप्रवृत्त करण्यास हें खंडकाव्य व स्फुट कविता उपयोगीं पडतील असा माझा समज आहे. तो कितपत खरा आहे हें ठरविण्यास पुस्तकास येणारी मागणी हेंच एक साधन आहे.

पालकांना आणि मुलांना हें पुस्तक आवडेल अशी मला आशा आहे.

२६।१।१, देवदार स्ट्रीट, कलकत्ता-१९
२८ ऑगस्ट १९५७, गणेश चतुर्थी.

रा. गो. खांब्रेटे

अर्पण पत्रिका

# माझे चुलते

## कै. ती. स्व. नारायण लक्ष्मण खांबेटे

### यांचे पूज्य स्मृतीस –

*बाबा, तुम्ही लिहिलेल्या काव्यांत, पदापदांत दिसणारी प्रतिभा, अलंकार, अर्थगांभीर्य व भाषा-सौष्ठव माझ्या काव्यांत नाहीत याची मला जाणीव आहे. देव दिसत नाही पण आपण त्याचा आशीर्वाद मागतोंच. मीहि आपल्याजवळ आशीर्वाद मागत आहे.*

–रामकृष्ण

# 'मातीचें सोनें' व स्फुट कविता

## अनुक्रमणिका


| | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| परीस १ ला | ... | ... | १ |
| परीस २ रा | ... | ... | ५ |
| परीस ३ रा | ... | ... | ८ |
| परीस ४ था | ... | ... | ११ |
| परीस ५ वा | ... | ... | १७ |
| परीस ६ वा | ... | ... | २० |
| परीस ७ वा | ... | ... | २२ |
| परीस ८ वा | ... | ... | २६ |
| परीस ९ वा | ... | ... | २९ |


### स्फुट कविता


| | | | |
|---|---|---|---|
| उलटा परीस | ... | ... | ३२ |
| उद्योग मंदिर | ... | ... | ३३ |
| उद्योग मंदिर कोठें आहे ? | ... | ... | ३४ |
| ओढयाने काय सांगितलें ? | ... | ... | ३४ |
| पालीचे उदाहरणावरून | ... | ... | ३५ |
| घडयाळाने काय सांगितलें ? | ... | ... | ३६ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ९४.२५९

# मातीचें सोनें

## परीस १ ला

चार वाजले मुंबादेवी जागृत कीं झाली
दूध घेउनी दारापाशीं देती आरोळी
भय्ये, बहुजन तसे गुंतले प्रातःकर्मात;
कुणी बैसले तैसे होते सुखें चहा पीत.
अग्निरथांचे भग् भग् करणें टम् टम् ट्रामाचें
मोटारीचें पोंक् पोंक, उघडें दुकान चाहाचें
लगबग ऐशी रस्त्यावरतीं घरांत ही होती
म्लानवदन परि एक बैसला लावुनिया ज्योती
करीं लेखणी एका होती कागद दुसऱ्यांत
लिहीत होता विषण्ण हृदये कांहीं तरी त्यांत.

कांहीं शब्दां लिहुनी थांबे पुन्हा लिही कांहीं
हताश होउनि पुनरपि थांबे; वदे, ‘योग्य नाही’
प्रयत्न करणें असे आपुलें एक जगीं काम
यश देणें वा अपयशि करणें ईशाचें काम.
कितीक वेळां गेलों, आलों परतुनि हिरमुसला
दैव देव हा मजवरि दिसतो आहे रुसलेला.
दारिद्र्याच्या पंकीं होतों–आहे रुतलेला–
विद्या केली बहु श्रमानें; ये हें फल त्याला !
बी. ए. झालों तरी विचारी जगतीं नच कोणी
हातिं न कवडी काय मिळविलें आजवरी शिकुनी ?

गेले दिन ज्या कालीं होता मान शारदेला
आतां झोळचा घेउनि हातीं मागा भिक्षेला.
मुंबादेवीमध्यें जेव्हां पदक्षेप केला
हुरूप सगळा त्यावेळींचा पावे नाशाला.
पहिल्या क्लासामध्यें आलों, पहिला नंबरही
परी शेवटीं झाली त्याची परिणति दैवा ही
जरी मिळेना आज नौकरी निराश होउनिया
धीर नरानें किती धरावा ? जातों सोडुनिया
मुंबादेवी, निजसदनाप्रति, देहा नच ठेवी
‘अशा शिक्षणें’ वदुनी लोकां परिणति ही बरवी

विचार करुनी पुन्हा लिहाया केली सुरवात
बरेच कागद लिहिल्यानंतर मालविली वात.

\+ \+ \+

'क्रॉनीकल' घ्या कोणी वदती कुणी 'नवाकाळ'
'लोकमान्य' कुणी बोलति ऐसें रस्त्यावरि बाळ
बाहिर आले डोळे चोळित आळसही देत
लेखक अमुचे क्रॉनीकलचा अंक विकत घेत.
व्हेकन्सीच्या कॉलमवरुनी डोळे फिरवीले
भर भर भर भर; कांहीं कागद पुन्हा तयें लिहिले
लगबग लगबग तोंड धुवोनी चहा पान केलें
धांदल केली; कसें तरी मग स्नान पार पडलें;

धोतर पिळुनी झटकुनि वाळत कसें तरी टाकी
झप झप झप मग खानावळ तो जेवाया गाठीं
कपडे करुनी अर्जाचें करिं घेई भेंडोळें
बोरिबंदरावरिल घड्याळीं दहा तया दिसले
हु:श करोनी कोटामध्यें शिरला रघुनाथ
उघडी पाहुनि एक कंपनी शिरे प्रथम तींत
'म्यानेजर का असती ?' ऐसा प्रश्न तयें केला
'येतिल थोड्या कालें' ऐसे चपराशी वदला
तिष्ठत बसला तेथें अर्धा तास बघत वाट
स्वारी आली करुनि एकदां फार थाट माट.

लालीम्लीचा शार्ट कोट तो होता अंगांत
फ्लानेलीची पाटलून ती तैशी पायांत
मॅक्रोपोलो सिगार होता धरिला तोंडांत
विल्सन गोगल्स नेत्रांला कीं शोभा त्या देत

कर कर कर कर वाजत होता पायींचा बूट
झाली स्वारी खुर्चीवरतीं आरुढ थाटांत.
लीनपणानें अर्ज घेउनी गेला रघुनाथ
नमस्कारुनी अर्ज द्यावया करी पुढें हात
चष्म्यामधुनी दृष्टि फेकुनी 'व्हेकन्सी नाहीं'
परुष भाषणा ऐशा वदला हसुनी लवलाही

निघुनी गेला तेथुनि दुसरीकडे अर्ज नेई
उत्तर ठरलें नशिबीं त्याच्या व्हेकन्सी नाहीं
दुसरि कंपनी तिसरी ऐशा पंचवीस झाल्या
परी नोकरी कुणि ना दिधली त्या हतदैवाला.
मरो नोकरी व्यर्थ जाहले श्रम सगळे माझे
मनीं ठरविलें कायम केलें देशीं जाण्याचें.
तेथुन आला गृहा परतुनी रडे स्फुंदस्फुंदे
जणूं नोकरीवांचुन जगतीं दुसरे ना धंदे

## परीस २ रा

उत्साहाचा भंग जाहला माझ्या आज पुरा
प्रयत्न याहुन काय करावा ? दुर्दैवीच खरा.

पुरे जाहली मुंबादेवी तिला रामराम
पुरे जाहलें जगती जगणें तया रामराम
उद्या निघावें प्रभात कालीं अपुल्या गावास
तिथें मरावें उरली आहे शेवटची आस
रड रड रडला. कोण विचारी जगीं दरिद्ऱ्याला ?
कोण विचारी नभीं फिरे त्या अजला जलदाला ?
त्रस्त मनानें कपडे घालुन गेला बाहेर
बॅक्-बे वरतीं विषण्ण हृदयें पाही तो नीर.
समुद्र लहरी उसळत होत्या काठांशी येती
भिंतीवरतीं आपटूनिया फुटूनिया जाती

निजहृदयाची तुलना केली त्यानें लहरींशीं
उठल्या माझ्या भंग पावल्या महत्व–जल–राशी.
यांच्यापरि मी प्रयत्न केला मोटेपण याया
यांच्यापरि परि व्यर्थ जाहला. कष्टविली काया
मद्‌हृदयाशीं तुलना होते सागर–लहरींची
करूं नये का सहकाऱ्याशीं इच्छा मैत्रीची ?
आलिंगाया उत्सुक झालों सागर लहरींना
जन्मभूमिचें दर्शन घेउनि मिळेन मी यांना
रत्नाकरसा मित्र मिळाया महद् भाग्य लागे
दास्याची मग कशास परवा हृदयाला लागे ?

सुदामदेवा श्रीकृष्णानें दिधलें स्वर्णपुर
या गरिबाला वारिराशी हा देइल रत्नपुर
उदार ऐसा जगतीं नाहीं दिसला मज दाता
सर्व खजीना स्वतांच देतो मित्राच्या हाता
धनिक न त्यातें, गरीब नाहीं सर्वांशी सम तो
पुनरपि त्याच्या गेहाहूनी परत न कुणि फिरतो.

० ० ०

कांता विसरे पुत्र त्यापरी जनक तशी माता
सर्व विसरुनी रत्नाकरगृहिं होई सुखभोक्ता

० ० ०

रजनिनाथ तो नभीं उगवला तशा तारकाही
रात्र जाहली याचें त्याला स्मरण परी नाहीं

जललहरीपरि क्रीडा केली सुखें चंद्रम्यानें
तारागणही नाचत होता त्याच्या नादानें.
तुरळक तुरळक जलद धांवती चंद्रा लपवीती
लुप्त चंद्रमा पाहुनि तारा भयाभीत होती.
रघुनाथाच्या हृदयाकाशीं विचारेंदु नाचे
सुखदासुखदा—विविध कल्पना तारागण नाचे
अपयश रूपी जलद झांकिती उन्नति चंद्राला
सुखद कल्पना असें पाहुनी भयाभीत झाल्या
जागृत झाला विचारतंद्रीमधुनी रघुनाथ
विषण्ण हृदयें खिन्न मनानें धरी गेह पंथ.

घरीं जाउनी सर्व सिद्धता केली जाण्याची
काय दु:स्थिती दिसते आहे नोकर वर्गांची

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम
क्रमांक नि:

# परीस ३ रा

बी. ए. आले बी. ए. आले हलवित कर दोन्हीं
ऐसें वदती मुलें तयाला येई तें कानीं.
लहान पोरें ऐसें वदती थोर बोलणार
वदणाऱ्याच्या तोंडा कोणी जगति न धरणार.
आजकालचा विषय जाहला मोठा चर्चेचा
घडा फोडिला माथीं त्याच्या कोणी दोषाचा;
अक्कल त्याला नसेल कांही नोकरि करण्याची
कैसें यावें गृहास परतुनि लाज नाहिं याची ?

ट फ, ट फ, ठावें ज्यांना मिळविति ते पैसा
तितुकाही हो मिळे न तेथें रघुनाथा कैसा ?
शाम्या गेला येथुनि शिकुनी यत्ता जो चार
बापाला तो रुपये धाडी मासा दस–चार.

पूर्वी जे जे म्हणती त्याला या या रघुनाथ
जाती त्याच्या बरोबरीनें मिळवुनिया हात.
मान समजति गांवीं आहे संभाषण त्याशीं
उकरुनि काढुनि कांहीं बोलती रीत असे ऐशी
चक्र उलटलें उन्नतिघट तो आज जाइ खालीं
वरतीं याया अवनतिकुंभा आज येइ पाळी.

पूर्वी वाटे प्रखर सूर्यही फुल्ल चंद्रबिंब
चंद्रबिंब परि अतां वाटतें दाही रविबिंब.
शितें जोंवरी असती तोंवरि भुतेंहि जमतात
शितें संपतां काल पाहुनी तेथुन जातात.
आम्रीं जोंवरि फलें मधुर ते कीर राहतात
आग लागता त्या वृक्षाला तेथुन पळतात.
सौख्याचे हे लोक भुकेले कोणि न व्यसनांत
थारा देई कृतज्ञ होउनि मोदें जगतांत.
बी. ए. झाला मान नोकरी मिळेल अजि त्याला
समजुनि ऐसें कोणी कोणी दिलें फराळाला.

o o o

उत्साहानें धीर द्यावया उद्युक्त न कोणी
धिःकाराचा टोला परि जन शिरावरी हाणी.
काय जगूनी करावयाचें याहुन मरण बरें
चारुदत्त जें वदे नाटकीं आहे सर्व खरें.
दारिद्र्यानें ग्रस्त नराचा ग्रस्त असे मान
अपमानाच्या फांशीला जणुं लटके ती मान.

पैसा ज्याच्या पाशीं आहे गुणगण त्यापाशीं
सर्व गुणातें दरिद्रतासुर सदाकदा नाशी.
काय करितसे मनुज त्याकडे जग न कधीं बघतें
मनुजानें परि केलें जें का पाहूं द्या ह्मणतें ?

आपण दोषी; काय ह्मणोनी जगा दोष द्यावा
नफा आपुला आपण तैसा तोटा सोसावा.
जखम खोल जी हृदयामध्यें करिती वाग्बाण
लोहबाण ते बरे त्याहुनी मला वाटतात.
अपमानाच्या घोर कर्दमीं श्रेयस्कर रुतणें
नसे याहुनी बरें वाटतें असुत्याग करणें
मित्र जहाले शत्रू माझें विपरित ये काल
आश्रित जाती उडुनी; जातां छाया तात्काल.

# परीस ४ था

सिद्ध जाहली संध्या व्हाया विलीन रजनींत
भास्कर करण्या स्नान उतरला होता उदधींत.

मेघांवरतीं सुवर्ण लिपी भास्कर जातांना
मित्रानें जणुं भेट दिधलि त्यां मित्रां जलदांना
किंवा माला पुष्पें दिधली पूजा करण्यास
स्वर्गामधल्या रंभानीं वा रविला शय्येस.
दिसे रक्तिमा नीलाकाशीं होतां रव्यस्त
पृथ्वीसतिचें लाल जहालें मुख त्यानें त्रस्त
काळी कांबळ हळूच पसरी अपुली अंधार
दिवे लागले होते तेव्हां ते दारोदार.
प्रकाश सरला राज्य संपलें भास्कर रायाचें
अंधाराचें सुरू जाहलें रजनीनाथाचें.

आज परंतु राजा गेला होता बाहेर
सहल कराया त्या योगानें पुराच अंधेर
रातकिडयानीं शब्द कराया केली सुरवात
विहंगमानीं झोप घेतली थांबवुनी गीत.
डोळ्यांमध्यें बोट घालणें कठीण तें वाटे
ठेंचाची मग गोष्ट कशाला जातांना वाटे ?
भवति न भवती करुनि शेवटीं मरणाचा मार्ग
अपमानाहुन श्रेयस्कर त्या; तुच्छ गमे स्वर्ग.
दिवस ठरविला होता त्यानें आज मरायाचा
नोकरिपायि मार्ग चालणें तयास मरणाचा.

सामसूम हो जिकडे तिकडे शब्द न ये कानीं
मरणद्वारीं चालत गेला आपुल्या पायानीं
धडधड छाती त्याची होई मार्गे जातांना
गती मिळेना थोडया कालें त्याच्या पायांना
पुनरपि चालूं मार्ग लागला हृदयीं धरि धीर
जलाशयाचा विषण्ण हृदयें गाठीं तो तीर
उभा राहिला टेंकाडावर उदधीवर नजर
टाकुनि, करद्वय जोडुनि बोले करितों मी नजर
प्राण आपुला तुला सागरा, सांभाळीं माते
प्रेमानें मज, जशी रक्षिते माता बालातें.

कोंकणचा हा देश भिकारी कोणी वदतात
कोंकणचा हा देश भिकारी कोणी म्हणतात

कोंकणचा हा देश बुद्धिचा कोणी म्हणतात
कोंकणचा हा देश सुखाचा कोणी वदतात
कोंकणचा हा देश भिकारी प्रतीति मज याची
म्हणुनी अपुल्या पायापाशीं आश्रय हा याची.
बाकीच्यांचा अनुभव मजला अजुनी ना आला
सुखबुद्धीचा माझ्या अजवरि लोप असे झाला.
ज्या बुद्धीचा उदरा भरण्या होइ न उपयोग
तिला महत्वा कैसें देऊं ? सुखा नसे योग,

म्हणूनि प्रार्थना करण्या आलों अनाथ मी बाळ
चरणीं वाहतो मला तुझ्या या; मातें सांभाळ.
काय वदूं मी तुला सागरा ? होशिल का मित्र
चांडाळाच्या गेहावरती फेंकी कर मित्र !
उगाच कां मग दिधला तुजला दोष अभाग्यानें
सोन्या तुलिलें हातीं घेऊनि अज्ञें पितळेनें.
पद्मराग मी कांच समजलों, हिरा तसा गार,
राजाला मी रंक बोललों; उष्णाला गार.
परिसाला मी दगड म्हणालों, चुना अमृताला,
डोळसास मी अंध समजलों, गाढव घोड्याला,

अपराधाची क्षमा करी तूं असें अंध दीन
क्रोधमदाग्नि अंध करीतो थोर तसा सान.
क्षमा करोनी ऐक सागरा गरिबाची गोष्ट;
क्षुल्लक तुजला दिसेल परि मम हृदया दे कष्ट.

कशा कष्टवुं सांगुन तुजला माझी दैव कथा
शालजोडिच्या वापरणाऱ्या देऊं का कंथा ?
रत्नाकर तूं, लक्ष्मी मुलगी, विष्णू जामात
कोणावरही इहलोकीं तूं करशिल बा मात.
भेरी जेथें सदा गर्जते तेथें तुणतुणणें
पुरे कसें बा पडेल उदधे ? तसेंच मम ह्मणणें.

हात जोडुनी विनती करितों रत्नाकर राजा
पोटामध्यें घे गरिबाला. माझा हो राजा.
प्राणदान कुणि जगीं मागती, मी आहे उलटा
प्राण हराया माझ्यावरतीं धाड तुझ्या लाटा.
रत्नांचा मी ठाव घ्यावया येत नसें कांहीं
श्रीमंतांच्या संपत्तीला बघणें गरिबांहीं
योग्य नसें; त्या योगें होईल जागृत मम लोभ
मेलेल्याला कशा पाहिजे रत्नांचा लोभ.
इतुकें बोलुनि डोळे मिटले, उडी मारणार
समुद्रास तो देह आपुला अर्पण करणार.

तों धरिलें त्या, उडी मारितां एका साधूनें
जणूं धाडिलें प्राणरक्षणा दूता उदधीनें.
भव्य तनूचा, गौरवर्ण तो तेजस्वी होता
लकलक करिती नयन तयाचे वृद्ध जरी होता.
दाढी त्याची शुभ्र लांबशी, कमंडलू हातीं
पायि खडावा चटचट वाजति, माला करिं होती;

खाकेमध्यें कृष्णजीन त्या, कफनी ती भगवी
पाहुनि त्यातें नमस्कारण्या स्फूर्ति मनीं व्हावी.
उलटुनि पाही तया यतीला जेव्हां रघुनाथ
पुढें होउनी पदीं ठेवि तो साधूच्या हात.

दीनवत्सला कृपा करा ह्या रघुनाथावरतीं
अनुभव घ्याया परलोकींचा जातों मी वरतीं;
दीन जना या आशी द्यावी असे प्रार्थना ही
दयासागरें कसें ह्मणावें बिंदूला नाहीं.
निजकर उचलुनि शीर्षावरतीं हांसत मुनि ठेवी
‘जीव द्यावया रघुनाथा तुज इच्छा कां व्हावी’?
पोट जाळण्या खटपट केली नोकरि मिळण्याची
अपयश आलें म्हणुनी करितों परिणति जीवाची
दास्य कर्दमीं झेंप घ्यावया प्रयत्न केलास
यश ना आलें म्हणुनी द्याया तयार प्राणास

दास्य एवढें जगी असे का अपणा उरलेलें;
दुसरें कांहीं अपुणाकरितां नाहीं का उरलें.
इतुकें शिकुनी काय मिळविलें दास्याचा लोभ
शिकण्याचा का हाच फायदा–हाच तुम्हां लाभ.
डोळे फेंका इकडे तिकडे दिसेल तुम्हाला
उद्योगानें जपान पावे मोठ्या विभवाला.
किती चिमुकला देश असे हा परी पुढें आला
दास्यराक्षसा ठार मारणें उभारुनी भाला.

दास्य शृंखला वदेल कोणी अस्सल सोन्याची
परी शृंखला तिला न सरि ये स्वतंत्र–लोहाची.

उद्योगानें–हिंमत धरुनी केलें जरि कार्य
कधीं न राहिल मागें केव्हां खरा खरा आर्य.
तोंड फाडुनी जरी बैसला सिंह मदोन्मत्त
हरिण न येउनि पडेल तोंडीं जरी असे स्वस्थ.
देइल तुकडा माझा भाऊ देइल धनि अथवा
कशा करावी आशा ऐसी सांग मला बाबा ?
जगीं नसे का अन्य मार्ग तुज उदरंभरणाचा
जीव कशाला नाहक त्यजिसी मोठ्या मोलाचा !
व्यर्थ शिणविलें अभ्यासानें अपुल्या यष्टीला
इतुकें शिकुनी मार्ग न गवसे उदरंभरणाला.

पुष्कळ शिकलां–मोठे झालां–भीक मागणार
दुसरा कोणी मुळीं न शिकुनी भीक मागणार
दोघांमध्यें फरक राहिला सांगा मज काय ?
गाढव दोघे विवस्त्र आणि शृंगारित काय.
गुंडाळूनी लाज आपुली पाटी घे हातीं
त्यायोगानें लक्ष्मी येइल खचित पहा हातीं.
इतुकें बोलुनि अदृश्य झाला तेथें मुनिराय
डोळे फाडुनि बघत राहिला साधुचा काय.

# परीस ५ वा

पहाट झाली खगगण करितो प्रेमें स्तवनाला
'उठा टाकुनी शय्या अपुली' वदतो लोकांला

"उदित जाहला भास्कर राजा उद्यमरत व्हावें
उत्साहानें नमुनी देवा कार्या लागावें.
सोन्यापरि हा दिवस चालला तासातासानें
घात आपुला कराल आपण उशिरां उठण्यानें"
खगगण होता सांगत ऐसें दारीं प्रत्येका
परि न उलगडा त्याचा होई त्यांतिल कित्येकां.
उद्योगाची महती गाई कांहीं क्षण पक्षी
उडे तेथुनी कार्य आपुलें घेउनिया लक्षीं.
निज जनकातें पुन्हां नोकरीसाठीं मी जातों
यत्न करोनी पुन्हां एकदां निजदैवा बघतों.

वरकरणीं हे शब्द बोलला मनीं साधुशब्द
वारी देतो ओरडूनिया जसें जना अब्द.

सायंकाळीं मुहुर्त पाहुनी करी गृहत्याग
बोटीवरती पसरुनि शय्या टाकी वरि आंग.
झोप कशी त्या यावी मागे पोट सदा लागे;
'काय करावें' 'कसें करावें' विचार मनिं वागें.
कोणी मजला पाहुनि हंसतिल मूर्खहि जन कांहीं
वदतिल मजला. 'करी हमाली लाज कशी नाहीं'
झोंप लागली स्वप्न तयाला पडलें झोंपेंत
वैभव दिसलें असें मिळविले मानहि जगतांत.

जागा झाला मोद मनाला त्याच्या बहु झाला
निश्चय अपुला जो पूर्वीचा कायम तो केला.
प्रातःकाळीं वेळेवरती बोट उभी राही
मुंबापुरिला नव्या स्वरूपीं पुनरपि तो पाही.
मुंबापुरिची अतर्क्य लीला, मोहमया सकला
मोहमयी ही म्हणुनी वदती सारे लोक तिला.
उतरुनि खाली तसाच गेला मित्राचे गेहीं;
एक दोन दिन त्याचे येथें विश्रांती घेई.
बाहेरूनी जरि विश्रांती करी तयारी ती
पाटी त्यानें विकत घेतली हमालिच्या साठीं.

तिसरे दिवशीं परळावरतीं खोली छोटीशी
तयें पाहिली रहावयातें थोडद्या भाडद्याची.
हमाल तेथें बरेच होते रहात दाटींत
तिथें राहुनी त्यांचेमध्यें असे सदा मिळत.

सुख दुःखाच्या गोष्टी बोले रात्रीं सर्वांशीं
स्वभाव त्याचा गोड पाहुनी मैत्री हो त्यांशी.
दारुबाज कुणी त्याचे झाले मित्र तसे अन्य
दुर्व्यसनीं जे पैसे उधळिति, खाया ना अन्न.
भारतांतल्या गोष्टी सांगे त्यांना बोधाया,
प्रेम वाढलें त्याचेवरचें म्हणती त्या या या.

कुसुम सुगंधित जमिनीवरती पडतां तिज वास
जसा लागतो, सद्‌गुण वर्धी त्याचे शब्दांस.
भक्ती वाढत त्याच्यावरची दर दिवशीं गेली
असे भावना त्या सर्वांची देवापरि बसली.
आनंदानें तया सांगती गोष्टी सांगाया
कुणी तयाला आग्रह करिती ईशस्तव गाया.
जरी न त्याचा मंजुळ स्वर तरि तयां गोड वाटे
ऐकुनि त्यांच्या हृदयामध्यें मोद अती दाटे.
नव्या कल्पना कुटुंबसौख्या त्यानें सांगितल्या
ऐकुनि संमति देउनि त्यांनीं फलद्रूप केल्या.

टिळकजयंति, शिवजन्मोत्सव सुरू तयें केले
गणपति–पूजन, विजयादशमी तसेच ते मेळे.
राष्ट्र भावना–धर्म भावना जागृत ती झाली
प्रत्येकाच्या हृदयामध्यें सज्जनता घुसली.
त्या योगानें प्रत्येकाची सुधारणा झाली
प्रत्येकानें थोडी माया जवळ असे केली.

# परीस ६ वा

घ्यायाः कामें अंगावरतीं केली सुरवात
हमाल तेथिल त्याच्या कामीं मित्रत्वें खपत.
हळु हळु ऐशीं छोटीं मोठीं कामें तो घेई
परळावरच्या तत्सुहृदांचा लाभ सदा होई.

साधि रहाणि, विचार सरणी उच्च मनीं होती
'उद्यम केल्या यश हें येईल' शंका हृदिं नव्हती.
चटणी भाकर दोन प्रहरीं निशीथ समयीं ही
चैन जिवाला कोण्या परिची ठाऊक ही नाहीं.
चार वाजतां नित्य उठोनी देवाचें नांव
शीतल सलिलें स्नान करोनी; कामावर धांव.
विश्रांती त्या ठाऊक नाहीं, दिवसा रात्रींत
कीर्ती द्रव्या खटपट करणें ऐशी अश्रांत.

पहिल्यापासुनि कामावरतीं शेवटपर्यंत
असती त्यांना कांहीं तरि तो बक्षिसही देत.

त्या योगानें तया चिकटुनि हमाल बहु होते
कल्याणाचा मार्ग दाविला तयांस रघुनाथें.
नोकरिकरितां मुंबईत जो फिरत सदा होता
देई इतरां तोच नोकरी; आज बने दाता.
उद्योगाची कांस धरोनी जाई जो पुढती,
कधीं न त्याला दारिद्र्याची जगीं असे भीती.
उत्साहाने कार्य करावें निश्चय दृढ ठेवा
आपुल्या हातीं त्वरित यावया सुयशाचा ठेवा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६८२५

# परीस ७ वा

कामावरतीं गेला होता दुसऱ्या गांवास
मजूर घेउनि कामाकरितां करी तिथें वास.

नभीं चंद्रमा आला होता परी न तो पुरता
पृथ्वी सतिला उजेड द्याया होई ना पुरता.
जलद मधूनी तया झांकिती–दुःखीं दुर्दैव
उभें राहावें स्थिती भोगितो तैसा शशिदेव.
तेजाचा जणुं गोळा त्यातें दूरवरी दिसला
लज्जित होउनि इंदु ढगाच्या आड जणूं दडला.
काड काड जणु वीज ओरडे, श्रवणीं तें आलें
रघुनाथातें आग लागली दूर असें दिसलें.
स्तिमित दृष्टीनें त्या बाजूला पाही रघुनाथ
दीनगृह तें तयास बाही द्यायाला हात.

दुर्दैवानें स्थिती तयाची भयद असे झाली
उत्कट रागें कांहीं भागा आली जणुं लाली.
आग लागली खात्री त्याच्या आतां मनिं झाली
मजूर उठवुनी भांडी घेउनि सर्व तिथें गेलीं.
चोहों बाजूं होती तेव्हां अग्नीची स्वारी
कोणाचीही छाती नव्हती फेंकाया वारी.
आगीचे जणूं लोळ भाजिती सभोंवतीं सर्वा
आनंदानें अग्नी वाढे तयास ना परवा.
एक कोपरा अजुनी नव्हता पडला ज्वाळांत
धूराचे परि मोठे लोंढे त्यांतुन ते येत.

सर्व मंडळी बाहेर आली; परी एक बाला
आंत अडकली शयनागारीं तिच्या वरी घाला
दुर्दैवाचा येवुनि पडला. अग्नी खाणार
कोण संकटीं जाउनि तिजला इथें आणणार ?
'ताई' 'ताई' "हाय हाय गे इंदू गे इंदू
रडावयाला मुळिं न राहिला मन्नयनीं बिंदू.
हाय ! अग्निरे तिला खावया येथें आलास
एकुलती मम प्रियतम मुलगी मुकली प्राणास.
धांवत धांवत तेथें आला वेगें रघुनाथ
'कोणि नाहिंना' प्रश्न तयानें केला 'गेहांत ?'

"नाहीं कैशी प्रियतम माझी मुलगी एकुलती
आंत सांपडे हरिणीशिशुसम दावानलिं हो ती"

कोठें आहे सर्व तयानें पृच्छा मग केली
तिला आणण्या सर्व सिद्धता नंतर ती केली.
निमिषामध्यें स्नान करोनी गृहामधें शिरला
वीज दिसावी पुन्हा लपावी तसा जनां गमला.
धूर जाहला घरांत होता कांहीं ना दिसलें
भीषण ज्वाला खाया परि त्या आलेसें दिसलें.
तसाच चाले तों पायाला लागे कांहींसें
मनुष्य देहा मूच्छित पाहुनि इंदूसें भासे.

देहा घेउनि परत चालला तुळई तों पडली
एका मागुनि एक संकटें त्याच्यावरि आलीं.
जळकें लांकुड एका हातें सारुनिया दूर
धडपड करुनी बहु त्वरेनें आला बाहेर.
टाळ्यांचा तो गजर जाहला–नव्हे पुष्पवृष्टी
स्वर्गामधुनी जणू जाहली–आभारांसाठीं.
कृतज्ञतेचे अश्रु येती मातेच्या नयनीं;
गृह दहनाचें दुःख इंदुचा जनक न मुळिं मानी.
काय करावें उतराई मी कसा होउं याचा
विचार पडला येउनि पुढती मोठया पेंचाचा.

आग विझाली होती पुरती त्याचे मदतीनें
दोन्ही परिनें यश मिळवीलें त्या कामीं त्यानें.
प्रेक्षकजन ते निघुन चालले अपुल्या गेहांस;
नाटक होवो सुख दुःखाचें काय असे त्यांस.

"कोण्या शब्दें मान तुह्माला देऊं ना कळतें
उपकारांची मला कल्पना करितां ना येते.
शब्द न माझ्या पाशीं असती वर्णन करण्यास
इंदु आज मम तुह्मावांचुनी मुकती प्राणांस"
निजस्तुति ऐकुनि शांत मनानें वदला रघुनाथ
कर्तव्याची गोष्ट असे ही उपकार न त्यांत.

शब्द बोलण्या शिल्लक त्याच्या पाशीं जणूं नव्हते
वर्णन करण्या कृतज्ञताश्रू तन्नेत्रीं होते.

# परीस ८ वा

उत्कर्षोदधिलहरी होत्या उसळत जोरानें
समृद्ध झाला होता सौख्यें धनें तसा धान्यें.
गिरण्या त्याच्या दोन असोनी दुसरे ही धंदे
हात जोडुनी नमस्कारिती त्याचे जणुं बंदे.
आगीनें जो स्नेह जोडिला वाढत तो गेला
अहितकरांतुनि हितकर निघतें एखादे वेळा.
इंदुकलेपरि इंदू आतां वाढत सौंदर्यें
लज्जान्वित ही, लुप्त इंदुपरि भूषण ती आर्ये.

अवयव सौष्ठव जणूं रेखिलें चित्र अनंगानें
पाहुनि तिजला म्हणेल कोणी घडलि न ब्रह्मयानें;
प्रमुख रसान्वित सौंदर्यानें गुलाब कलिका ती
कंटक मर्दन करुनी घ्याया योग्य असे हातीं.

रोज येऊनी भेट देतसे तयांस रघुनाथ
परी न आला आज म्हणोनी म्लान इंदु होत.
दारापाशीं हळूच येई परत तशी जाई
पादरवाचा भास जाहल्या घाबरली होई.
उपवन शोभा पहावयाचें सोंग तिनें केलें
फुलें वेचण्या घरांत जाउनि परडीतें नेलें.

फूल राहिलें झाडावरतीं पानें तोडी ती,
पान पाहुनी लज्जित होउनि होई हास्यमती
स्थिती अशी कां ? हृदयसागरीं मनोहंस नाहीं
मौक्तिक शोधा करण्याला जणुं बाहेरी जाई.
थोड्यावेळें हृदयानंदक मौक्तिक घट दिसला
रघुनाथाला पाहुनि तिजला मोद अती झाला.
लाजुनि, हर्षित होउनि गेली धांवत गेहांत,
मूर्तिमंत जणुं हास्य देवता शिरली ती आंत.
इंदुमागुनि घरांत शिरला प्रेमळ रघुनाथ
इंदुमतीच्या प्रेमाला जणुं करावया साथ.

इंदुमतीच्या जनकापाशीं जाउनि तो बसला
गप्पा गोष्टी, विविध कथानीं काळ असे गेला.
क्षण थांबोनी इंदूमतिचा जनक म्हणे त्याला
पदरीं घेउनि इंदुमतीला धन्य करा तिजला.
उद्यमशीला, प्रेमळ हृदया, दीनोद्धर हातीं
सोनें होइल पडली येउनि करीं जरी माती.

पोरबाळ ना मजला दुसरें एकुलती इंदू
तुम्ही राखिला कुलोदधींतिल शेवटचा बिंदू.
आपण तिजला जीव देउनी वांचविली आहे
विवाह करुनी अपुली म्हणणें इतुकें परि राहे.

उपकाराचें ओझें माझ्या डोक्यावर आहे
थोडें तरि तें कमी करावें; इतकें ना साहे.
नकार तुम्ही तया न द्यावा, इच्छा मम आहे
होकारावर आशातंतू जिवंत कीं राहे.
उद्यां तुम्हाला कळविन ऐसें बोले रघुनाथ
थोड्या कालें तेथुनि निघुनी धरी गेहपंथ.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ५००५८ .. वि: काव्य ....
क्रमांक ९५५४ ........ नों. दि. ५/९/६९

# पर्रास ९ वा

जिकडे तिकडे मोद दाटला दिशादिशांना ही
सोनेरी ती शालू नेसुनि उषा पहा येई.
पल्लव हांसति, पवनें डुलती, हृदयीं आमोद
त्यांच्या भरला असें वाटतें—प्रमुदितही जलद.

विहिणींवरती छाया करण्या आतपत्र होती
जिकडे तिकडे विहार करिती सुधाशुभ्र दिसती.
आज तयांचे निर्मल झालें होतें जणुं हृदय
खादीच्या का पोशाखानें झांकिती निजकाय ?
आनंदानें हृदय भरोनी काळेपण गेलें !
आनंदाचे तुषार उडुनी होते का भिजले ?
रविकिरणानीं परिवर्ताया दर्पण आकाशीं
मंगलमय का स्वर्गकामिनी स्थापियती त्यांशीं ?

सुधा भरोनी होते अमरें ठेवियले घट ते
चुना लावुनी अभिषेकाया घट का ते होते !

खगगण मोदें नाचत होते, आनंदें गात
मंगल कालीं–विवाह कालीं–गीतें ते म्हणत !
लहान नीडीं कच्चीं बच्चीं पक्षांची होतीं
गोड घांस अजि मिळेल म्हणुनी, मुदित मनीं होतीं.
द्विजवर होते करीं अक्षता घेउनिया म्हणत
मंगलाष्टकें तीं उच्च रवानें; आशीर्वच देत.

++ ++ ++

थाट उडाला विवाह समयीं अन्नदान झालें
लहान मोठ्या नोकरवर्गा बक्षिसही दिधलें
उद्योगाची वृद्धि व्हावी, जावें दारिद्र्य
उन्नति व्हावी भारतभूची, व्हावी समृद्ध.

धनधान्यानें, प्रत्येकाच्या पोटाला अन्न
पुरें मिळावें, विलया जावें भारतभू दैन्य
म्हणुनी वार्षिक सहस्त्र रुपये द्याया बक्षीस
उद्यमविषयक शोध लावि त्या भरत–वर्ष–जास
जाहिर केलें रघुनाथानें सभामंडपांत
जिकडे तिकडे धन्यवाद जन देती गावांत

++ ++ ++

भटकत होता म्हणत नोकरी द्या हो ! द्या मजला
धनाढ्य आहे उद्योगानें आतां तो झाला

पूर्वी ज्याला थारा कोणी देईना, आल्या
या हो ! या हो ! बसा आदरें बोलति जन त्याला.

क्षुद्र वाटला पूर्वी ज्यांना होता रघुनाथ
उभे राहती त्याच्या पुढतीं जोडुनिया हात.
पूर्वी ज्याला दुःख सागरीं पडलों मी वाटे
परि उद्योगें दूर सारिले दुःखादिक कांटे.
पोट भराया कठीण वाटे जया मुंबईंत
सहस्र जीवां आज एकटा अन्न असे देत.

↔ ↔ ↔

उद्योगाचा धडा शिकविला इतरां रघुनाथें
उद्योग्याला भाग्य–यशश्री आनंदे वरिते

* शुभं भूयात् *

# स्फुट कविता

## उलटा परीस

### शार्दूलविक्रीडित

भिंती सुंदर पीतवर्ण दिसल्या गेहास एका मला,
कौशल्या बघुनी मनास बरवा आनंदही जाहला;
होत्या हेमरसें जणूं मढविल्या स्तंभीं दिसे रौप्य तें
आहे मंदिर बांधिलें कुणि तरी देवें असें वाटलें. ।। १ ।।

गेलों कांहि दिनीं पुन्हा परतुनी मी त्याच गेहांतरीं
भिंती शामलवर्ण पाहुनि अती आश्चर्यलों अंतरीं.
कोणी आयसरूप यास दिधलें हा कोणता हो मणी
झाला प्रश्न जसा तसा उलगडा, तात्काळ झाला मनीं. ।। २ ।।

आलस्याख्य असे परीस उलटा, स्वर्णास जो लावितां
लोखंडी बनवी क्षणांत घडवी रूपांतरा तत्वतां;
पूर्वीची सगळी कृती उलटवी आहे असा लक्षणी
उत्साही धनवान् युवा कुलजही पावेल नाश क्षणीं ।। ३ ।।

# उद्योग मंदीर

आहे भव्य सुरम्य श्रेष्ठ जगतीं मंदीर जें बांधिलें
नाना–रत्न–मणी विभूषित तनू देवास ही पाहिलें
उद्योग प्रभु लोक त्यास म्हणती यन्नाम दुःखा हरी
आहे केवळ भक्त वत्सल असा साक्षान्मुरारी हरी ।। १ ।।

पाहूनी; करितां विचार कळलें उत्साह पुष्पें तया
होतीं आणुनि वाहिलीं कुणि नरें शोधोनि विश्वीं जया;
भिंती त्या कसल्या म्हणून बघतां त्यां द्रव्य आत्मोन्नती
दारें तीं सगळीं अमूल्य दिसलीं त्या द्रव्य सत्यप्रिती ।। २ ।।

रत्नें कैक तयांस नाम बहुधा प्रत्येक ठेवी नवें
कोणि बोलति नाम 'धाडस' असें त्यालाच उच्चे रवें
भिंतीना दिधला सुरेख दिसतो जो रंग त्या बोलती
लोकीं लोक सदैव त्या "यश" असें; आहे टिकाऊ अती ।।३।।

## उद्योगमंदीर कोठें आहे ?

आहे पर्वत 'कष्ट' नामक महान् उत्तुंग चेतोहर,
तेथें 'निश्चय' लोक ज्यास म्हणती आहे असें जे पुर,
रस्ते सुंदर रुंद ज्यांत असती 'आनंद' सौख्यापरी
तेथे मंदिर आमुचें विलसतें 'अश्रांत' कूटावरी. ॥ ४ ॥

---

## ओढ्यानें काय सांगितलें ?

भेटाया उदधीस होय मजला इच्छा तसा मी निघें
मातें ना भय वाटलें विपनिंही आनंदुनि मी रिघें;
वाटेनें मज भेटला नद पुढें रत्नाकरा भेटलों
उद्योगें यश हें मिळेल जगतीं, हें तत्व मी शीकलों. ॥ १ ॥



---

REFBK-0009425

REFBK-0009425

## प्रो. गोपाळ कृष्ण गोखले यांचे अंकगणितांतील
# पालीचे उदाहरणावरून—

### वृत्त–मंदाक्रांता

जाते पाल प्रतिदिनिं सहा फूट भिंती चढून
रात्री येते घसरुनि परी खालतीं दोन फूट
भिंती फूट द्विदश सगळी; शेवटा जावयास
पालीला त्या दिन किति वदा लागती पोंचण्यास? ॥ १ ॥

++ ++ ++

सोपें आहे गणित करण्या सोडवाल क्षणांत,
तत्वा त्याच्या धरूनि हृदयीं चालणें या जगांत;
उद्योगानें करिल यश त्या सर्वदा प्राप्त होतें
ज्याचें चित्त व्यथित न कधीं संकटें मात्र होतें. ॥ २ ॥

क्र. २८२५ मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलपत
अनुक्रम १५७८ वि: काव्य
शाखा १७७४ नों: दि: ८।७।६९

# घड्याळानें काय सांगितलें ?

## वृत्त-मालिनी

टक टक टक बोलें, सांगतें हें घड्याळ
मिनिट मिनिट ऐसा जातसे सर्व काळ
जरि न सकल काला आपुलेंसें कराल
जगतिं यश न तुम्हा वा कदापि मिळेल ॥ १ ॥

करिन; बहुत आहे वेळ अद्यापि ऐसें
वदुन जरि न कार्या हात घालाल तैसें;
हळु हळु हळु वाटे वेळ जो जात आहे
त्वरित निघुनि जाई, कार्य राहील वा हे. ॥ २ ॥

किती तरि जगतीं या जन्मले आणि मेले
गणित न कुणि त्यांचें आजपर्यंत केलें;
विपल विपल ज्यानीं उद्यमीं घालविलें
गणित परि तयांचें सर्व देशांत झालें. ॥ ३ ॥

यश-धन-सुख-कीर्ती पाहिजे का मिळाया
क्षण पल दिनरात्रीं उद्यमीं घालवा या
खचित मग तुम्हाला सर्व कांहीं मिळेल
टक टक टक बोलें, सांगतें हें घड्याळ. ॥ ४ ॥

# पुनरागमन

निरनिराळ्या मासिकांतून व नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक, सामाजिक व काल्पनिक कथांचा संग्रह.

---

लेखक— रा. गो. खांबेटे

★

किंमत २ रुपये २५ नये पैसे
टपालखर्च निराळा.

# अंजन

तीन अंकीं – तीन पुरुष व तीन स्त्री–पात्रें असलेलें
आधुनिक एकांक प्रवेशी सामाजिक नाटक

---

लेखक— रा. गो. खांबेटे

★

किंमत १ रुपया ५० नये पैसे
टपालखर्च निराळा.

मिळण्याचा पत्ता—आपल्या बुकसेलरकडे किंवा
रामकृष्ण गोविंद खांबेटे,
२६।१।१ देवदार स्ट्रीट–बालिगंज–कलकत्ता १९.